**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/एआरडब्ल्यु/२०२०-२१/ 22177-79 दि. २४-११-२०२०.

**प्रति,**
**प्राचार्य,**
श्रीयश प्रतिष्ठाण संचलित,
श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी,
औरंगाबाद.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून मेकॅनिकल इंजिनिअरिंग विषयाच्या संशोधन केंद्रास मान्यता देणे बाबत.**

**संदर्भ :-** १) आपला संशोधन केंद्रासाठीचा प्रस्ताव.
२) प्रस्तावित संशोधन केंद्रासाठी तज्ञ समितीने सादर केलेला अहवाल.
३) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) अन्वये निश्चित केलेले निकष.
४) पीएच.डी. अध्यादेश १६७ (इ) अन्वये निश्चित करण्यात आलेले निकष.
५) अधिष्ठाता मंडळाने दि. २७-०८- २०२० रोजी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार केलेली शिफारस.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (१) ते (८) व पीएच.डी. अध्यादेश १६७ (इ) अन्वये विहित केल्यानुसार विद्यापीठाने / अधिष्ठाता मंडळाने प्राप्त प्रस्तावांची छाननी / तपासणी करुन नियुक्त केलेल्या चौकशी / तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार **मेकॅनिकल इंजिनिअरिंग** विषयाच्या संशोधन केंद्रास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून खालील कोष्टकात दर्शविण्यात आलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रवेश क्षमतेसह मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव | संशोधन केंद्राचे अभ्यासक्रमासह नाव | विद्यापीठाने निर्धारित केलेली प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, औरंगाबाद. | संशोधन केंद्र **मेकॅनिकल इंजिनिअरिंग** | १० विद्यार्थी |

प्रस्तुत प्रकरणी अधिष्ठाता मंडळाने शिफारशित केल्यानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १११ (७) अन्वये विहित केल्यानुसार मा. कुलगुरुंना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार उपरोक्त कोष्टकात विनिर्धिष्ठित करण्यात आलेल्या संशोधन केंद्रास मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी आपणास असेही अवगत करण्यात येते की, सदरील संशोधन केंद्राची मान्यता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ते शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पर्यंत अनुज्ञेय राहील. सदरील संशोधन केंद्राच्या मान्यतेचा कालावधी संपण्यापूर्वी सहा महिने अगोदर विद्यापीठास पुनर्रमान्यता / पुनर्रसंलग्नीकरणासाठी विहित शुल्क व पुरक दस्ताऐवजासह प्रस्ताव सादर करणे अनिवार्य राहील, अन्यथा सदरील संशोधन केंद्राची मान्यता आपोआप संपूष्टात येईल, याची कृपया सर्व संबंधितांनी गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

प्र कुलगुरु

**प्रतिलिपी :-**

१. **उपकुलसचिव,** पदव्युत्तर / पीएच.डी. विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.
२. **संचालक,** युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

-sd-
प्र कुलगुरु